**Principal:** *Nicky Walker*
**Assistant Principal:** *Anne McDonald*
**Assistant Principal:** *Kerry Bates*
**Assistant Principal:** *Mick Sweeney*
**Business Manager:** *Nicholas Macura*

## 19.5.2020

# CCPS COVID-19 शाळेत परततानाची मार्गदर्शकतत्वे

## शाळेची आरोग्य आणि सुरक्षा विषयक उपाययोजना

- द ऑस्ट्रेलियन हेल्थ प्रोटेक्शन प्रिन्सिपल कमिटी (AHPPC) चे म्हणणे आहे की, प्रती चार वर्गमिटरमध्ये एक पेक्षा जास्त व्यक्ती असू नयेत याबद्दलचा 'व्हेन्यू डेन्सिटी रूल' हा शाळेतील वर्ग किंवा कोरिडॉरसाठी योग्य किंवा व्यावहारिक नाही तसेच वर्गातील कामकाजात प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये 1.5 मीटर अंतर राखणे हे देखील योग्य वा व्यावहारिक नाही. त्यामुळे, आता प्रत्येक वर्गात 10 विद्यार्थी या स्थापित गुणोत्तराची आता गरज राहिलेली नाही.
- या बदलासाठी तयारी करण्यात शाळेच्या कर्मचाऱ्यांना मदत करण्यासाठी **सोमवार, 25 मे 2020 ह्या दिवशी विद्यार्थी शाळेत नसतील**. शाळा या दिवसाचा उपयोग विविध कामांसाठी करतील, उदा. त्यांच्या शाळेत आरोग्य सल्ल्याचे पालन होत असल्याची दक्षता घेणे, शाळेचा दिनक्रम पुन्हा आखणे, रिमोट आणि फ्लेक्झिबल अभ्यासादरम्यानच्या कलावधीत विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी एक उपागम स्थापित करणे, आणि असे विद्यार्थी ओळखणे, ज्यांना त्यांचे आरोग्य आणि हित यासाठी तत्काळ मदतीची गरज असेल.
- विद्यार्थ्यांना सामान्य दिनचर्येत परत आणताना त्यांना अपेक्षित असलेली मदत करणे, परिस्थितीचे भान ठेवून सद्य परिस्थितीविषयी त्यांना अनुरूप अशी सकारात्मक माहीती देणे तसेच त्यांना त्यांच्या शंका आणि भावना व्यक्त करण्यासाठी एका सुरक्षित वातावरणाची निर्मिती करणे याचे महत्त्व आम्ही जाणतो.

ऑन-साइट स्कूलिंगच्या पातळीवरील सर्व विद्यार्थ्यांनी शाळेत येणे अपेक्षित आहे. कोणत्याही वैद्यकीय सल्ल्याचा आधार नसताना जर पालकांनी आपल्या पाल्यांना घरीच ठेवण्याचे पसंत केले असेल, तर अशा परिस्थितीत त्या विद्यार्थ्यांना रिमोट शिक्षण देणे हे शाळेकडून अपेक्षित नाही. जर तुमच्या बाबतीत असे असेल, तर कृपया तुमच्या सब-स्कूल असिस्टंट प्रिन्सिपलशी संपर्क साधा.
फाऊंडेशन – ग्रेड 2: ॲनी मॅकडोनाल्ड
ग्रेड 3 ते ग्रेड 6 मिक स्वीनी
कल्याण: केरी बेट्स



*15 Silky Oak Drive*
*Cranbourne, 3977*
*Phone: 5991 3600*
Email: cranbourne.carlisle.ps@edumail.vic.gov.au
*Website:* http://www.cranbournecarlisleps.vic.edu.au

*"Many Cultures One Community"*

Cranbourne Carlisle Primary School

**Principal:** *Nicky Walker*
**Assistant Principal:** *Anne McDonald*
**Assistant Principal:** *Kerry Bates*
**Assistant Principal:** *Mick Sweeney*
**Business Manager:** *Nicholas Macura*

## इतर आरोग्य व सुरक्षा उपाय

- मैदानी उपकरणे वापरता येऊ शकतात. परंतु, वापराच्या आधी आणि नंतर विद्यार्थ्यांना हातांच्या स्वच्छतेची काळजी घ्यावी लागेल. अतिरिक्त स्वच्छता कार्यक्रमाचा एक भाग म्हणून रिसेस आणि लंचटाइम नंतर मैदाने हॉस्पिटल ग्रेडच्या डिसइन्फेक्टंटद्वारे पुसण्यात येतील.
- जर एखादे उपकरण एकापेक्षा जास्त विद्यार्थी हाताळत असतील, तर वापराच्या आधी व नंतर त्यांना हातांच्या स्वच्छतेची काटेकोर काळजी घ्यावी लागेल.
- विद्यार्थी थेट ड्रिंकिंग फाउंटेनमधून पाणी पिऊ शकणार नाहीत, म्हणून शाळेतील वापरासाठी विद्यार्थ्यांना स्वतःची पाण्याची बाटली आणावी लागेल.
- DET *विद्यार्थ्यांनी मोबाइल फोन वापरण्याबद्दलचे धोरण* यथावत राहील. दररोज सकाळी आपला फोन ऑफिसमध्ये सुपूर्त करताना विद्यार्थ्यांना डिसइन्फेक्टंट फडक्याने फोन स्वच्छ करण्यास सांगण्यात येईल. शाळा सुरू होण्याच्या अगोदर आणि नंतर फोन COVID SAFE ॲपसह फोन सुरू करता येऊ शकेल. शाळांमध्ये परिस्थितीचे योग्य व्यवस्थापन होत असते, ज्यात विद्यार्थी, कर्मचारी आणि भेटीस आलेल्या पाहुण्यांच्या हाजरीची नोंध असते, ज्यामुळे कॉन्टॅक्ट ट्रेसिंगला मदत होऊ शकते.

## मानसिक आरोग्य आणि कल्याण

जर तुम्हाला तुमच्या पाल्याच्या मानसिक आरोग्य व कल्याणाबाबत काही विशेष काळजी असल्यास लवकरात लवकर असिस्टंट प्रिन्सिपल यांना सूचित करा, जेणे करून आम्हाला एखादी उपलब्ध सेवा आणि मदत मिळवता येऊ शकेल.
फाऊंडेशन – ग्रेड 2: ॲनी मॅकडोनाल्ड
ग्रेड 3 ते ग्रेड 6 मिक स्वीनी
कल्याण: केरी बेट्स

## स्वच्छता

स्वच्छतेच्या काही व्यापक आणि वाढीव व्यवस्था सुरू करण्यात आलेल्या असून त्या चालू ठेवण्यात येतील. यामध्ये, संपूर्ण दिवस सतत सफाई करण्यात येईल, ज्यामुळे वारंवार स्पर्श होत असणाऱ्या सपाटीवरून संक्रमण होण्याचा धोका कमी होईल.

## ऑन-साइट हाजरी

कोरोना व्हायरस (COVID-19) च्या संक्रमणाचा धोका कमी करण्यासाठी शाळांद्वारे उचलण्यात येणारे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल म्हणजे कर्मचारी, लहान व मोठे विद्यार्थी आजारी असल्यास ते घरीच राहतील हे सुनिश्चित करणे.



*15 Silky Oak Drive*
*Cranbourne, 3977*
*Phone: 5991 3600*
Email: cranbourne.carlisle.ps@edumail.vic.gov.au
*Website:* http://www.cranbournecarlisleps.vic.edu.au

*"Many Cultures One Community"*

या व्हायरसच्या संक्रमणाचा धोका खूप कमी असला तरी, ज्या कर्मचाऱ्यांना किंवा विद्यार्थ्यांना गंभीर आजार होण्याचा धोका असेल, त्यांनी व्यक्तिशः त्यांच्या डॉक्टरचा सल्ला घेऊन शाळेत हजर राहण्याबाबत निर्णय घ्यावा.
शाळेच्या वातावरणात कोरोना व्हायरस (COVID-19) च्या संक्रमणाचा मुख्य धोका प्रौढांमध्ये आहे, त्यामुळे शाळेच्या आवारात फक्त तेवढेच लोक येतील, जे शाळेला आवश्यक सेवा प्रदान करणारे, काम करणारे किंवा त्यासाठी मदत करणारे असतील. पालकांना काही कारणाने शाळेशी संपर्क साधायचा असल्यास, त्यांनी कृपया शाळेच्या कार्यालयात फोन करावा.

**सर्व आजारी विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी घरीच राहणे अनिवार्य आहे.**

जटिल वैद्यकीय समस्या (रोगप्रतिकार प्रणाली बाधित असणाऱ्या विद्यार्थ्यांसह) असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी / पालनकर्त्यांनी, आपल्या पाल्यासाठी ऑन-साइट शिक्षण योग्य आहे का याबाबत निर्णय घेण्यास मदत व्हावी म्हणून आपल्या मुलाच्या डॉक्टरचा सल्ला घ्यावा. व्हिक्टोरियातील कोरोना व्हायरस (COVID-19) या जागतिक महामारीच्या स्थितीनुसार हा सल्ला बदलू शकतो. हे DET हेल्थ केअर नीड्सच्या धोरणानुसार आहे. याबाबत एखाद्या कुटुंबाला अतिरिक्त मदतीची गरज असल्यास शाळा ती मदत करेल.

असेम्ब्ली, सहली, शिबिरे आणि मोठा जमाव होण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या इतर अनावश्यक गोष्टी पुढील सूचनेपर्यंत स्थगित करण्यात येत आहेत.

## स्वच्छता

हातांच्या स्वच्छतेची सतत प्रभावीरित्या काळजी घेऊन प्रत्येक जण कोरोना व्हायरस (COVID-19) चे संक्रमण रोखू शकतो आणि स्वतःला सुरक्षित ठेवू शकतो. स्वच्छतेचे हे विशेष उपाय ऑन-साइट शिक्षण पुन्हा सुरू होण्याच्या काळात चालू राहतील.

- सर्व कर्मचारी व विद्यार्थी हातांच्या स्वच्छतेची नियमित काळजी घेतील, विशेषतः शाळेत आल्यावर, खाण्याच्या अगोदर आणि नंतर, नाक शिंकरताना, खोकला किंवा शिंक येत असताना किंवा शौचालयाचा वापर केल्यानंतर. जेथे गरज असेल, तेथे या बाबतीत कर्मचारी देखरेख आणि मार्गदर्शन करतील.
- जेथे साबण आणि पाणी सहज उपलब्ध नसेल, अशा प्रत्येक खोलीत हँड सॅनिटायझर पुरवण्यात येईल.
- सध्याच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना थेट ड्रिंकिंग फाऊंटेनमधून पाणी पिण्याची अनुमती असणार नाही. त्या ऐवजी, त्यांनी आपल्या वापरासाठी स्वतःची पाण्याची बाटली घरून आणावी (जी शाळेत पुन्हा भरता येऊ शकेल).



*15 Silky Oak Drive*
*Cranbourne, 3977*
*Phone: 5991 3600*
Email: cranbourne.carlisle.ps@edumail.vic.gov.au
*Website:* http://www.cranbournecarlisleps.vic.edu.au

**Principal:** *Nicky Walker*
**Assistant Principal:** *Anne McDonald*
**Assistant Principal:** *Kerry Bates*
**Assistant Principal:** *Mick Sweeney*
**Business Manager:** *Nicholas Macura*

## शाळेत येण्याची आणि जाण्याची वेळ

शाळेच्या वातावरणात कोरोना व्हायरस (COVID-19) चे संक्रमण होण्याचा सर्वात मोठा धोका हा प्रौढांकडून आहे. त्यामुळे, शाळेतील प्रौढांनी एकत्र होण्याचे प्रसंग टाळले पाहिजेत, विशेषतः मुलांना शाळेत सोडण्याच्या व शाळेतून घेऊन जाण्याच्या वेळी.

- शाळेचे कर्मचारी आणि पालक यांनी शाळेच्या आत किंवा आजूबाजूला एकत्र न होता फिजिकल डिस्टन्सिंगचे नियम पाळले पाहिजेत.
- फिजिकल डिस्टन्सिंग आणि शाळेच्या प्रवेश द्वाराशी आणि शाळेच्या आत विद्यार्थी आणि प्रौढ यांचा कमीत कमी संपर्क यावा यासाठीच्या व्यवस्थेत खालील गोष्टींचा समावेश आहे:
    - प्रौढांमध्ये अंतर कायम रखण्यासाठी शाळेच्या गेटजवळ वर्तुळे काढणे
    - पालकांना शाळेत येण्याची अनुमती असणार नाही व त्यांना फोन किंवा ईमेलच्या माध्यमातून शाळेशी संपर्क साधण्यास सांगण्यात येईल.
    - महत्त्वाच्या मीटिंग्ज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे होतील
    - कोणत्याही स्वरुपाच्या चर्चा किंवा भेटीगाठी दरम्यान सोशल डिस्टन्सिंगच्या निर्देशांचे पालन करण्यात येईल आणि प्रत्यक्ष संपर्क येणार नाही.
    - गरज भासल्यास आपल्या पाल्याला शाळेत पोहोचवण्याच्या व घ्यायला जाण्याच्या वेळा विभागून देण्यात येतील, जेणे करून शाळेच्या गेटपाशी किंवा वर्गांच्या बाहेर प्रौढांची गर्दी होणार नाही



*15 Silky Oak Drive*
*Cranbourne, 3977*
*Phone: 5991 3600*
Email: cranbourne.carlisle.ps@edumail.vic.gov.au
*Website:* http://www.cranbournecarlisleps.vic.edu.au

*"Many Cultures One Community"*